# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक:07.09.2026** **वार:सोमवार**

---

**ठळक बातम्या**

1. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत आज गोव्यात पश्चिम विभागीय परिषदेची बैठक.
2. 3 वर्षांत देश अमली पदार्थमुक्त करण्यासाठी पथदर्शी आराखडा जाहीर.
3. इस्रोच्या खासगीकरणाच्या संदर्भातील बातम्यांचे इस्रोकडून खंडन.
4. दिल्लीत सत्यनिकेतन परिसरात इमारत कोसळून 6 जणांचा मृत्यू.
5. सात्विक साईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीला चायना मास्टर्सच्या पुरुष दुहेरीचं विजेतेपद.

**क्षेत्रीय परिषद**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज गोव्यात पणजी इथं पश्चिम विभागीय परिषदेची 28वी बैठक होणार आहे. पश्चिम क्षेत्रीय परिषदेत महाराष्ट्र, गोवा, गुजरात या राज्यांसह दादरा आणि नगर हवेली, दमण, दीव या केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे. महाराष्ट्र, गोवा, गुजरातचे मुख्यमंत्री तसंच प्रत्येक राज्यातील आणि दोन वरिष्ठ मंत्री या बैठकीत सहभागी होणार आहेत. केंद्र सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांचे वरिष्ठ अधिकारीही यात सहभागी होणार आहेत.

**प्रेसिडेंट पोलिस कलर**

दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते गोवा पोलिसांना आज प्रेसिडेंटस् पोलिस कलर प्रदान करण्यात येणार आहे. या सर्वोच्च सन्मानामुळे गोवा पोलिसांच्या समर्पित सेवा, शिस्त आणि निष्ठा यांची दखल घेतली जाणार आहे.

**अमित शहा-नशामुक्त**

देशाला 2029 पर्यंत अमली पदार्थमुक्त करण्यासाठी, तीन वर्षांचा पथदर्शी आराखडा काल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गोव्यात जाहीर केला. अमली पदार्थ सेवनाविरूद्ध राष्ट्रीय पातळीवर समन्वित मोहीम राबवण्याचे आवाहन त्यांनी काल वार्ताहर परिषदेत बोलताना केलं. एनसीसी, एनएसएस आणि 'माय भारत' या युवा उपक्रमांच्या माध्यमातून लाखो 'नशामुक्ती मित्र' तयार करण्याचा मानस असून, शिक्षण मंत्रालय आणि युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय तसंच शैक्षणिक संस्थांच्या सहकार्यानं शैक्षणिक परिसर अमली पदार्थमुक्त करण्याचा सरकारचा संकल्प आहे. व्यसनमुक्ती केंद्रांची संख्या तिप्पट करण्यात येणार असून, दहा हजार स्वयंसेवक त्यात सहभागी होणार आहेत. अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी आवश्यक

कारवाई करण्यात येत आहे. नक्षलवादाप्रमाणेच देशातून अमली पदार्थ सेवनाची समस्याही समूळ नष्ट कऱण्यात येईल, असंही शहा यांनी नमूद केलं.

**पॅरिस-पीएम**

भारत आणि फ्रान्स यांच्यादरम्यान विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी विकसित होत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. फ्रान्सची राजधानी पॅरीसमधील स्वामीनारायण हिंदू मंदिराचं उद्घाटन काल झालं. त्यावेळी पंतप्रधानांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थितांना संबोधित केल. तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि संरक्षण क्षेत्रापासून अंतराळ क्षेत्रापर्यंत विविध क्षेत्रात दोन्ही देश नव्या गतीनं आणि उर्जेने वाटचाल करत असल्याचे त्यांनी नमूद केलं.

'इस्कॉन'च्या माध्यमातून भारत आणि फ्रान्स यांच्यातील आध्यात्मिक, सांस्कृतिक संबंधांचा एक नवीन अध्याय सुरू असल्याचंही पंतप्रधान यावेळी म्हणाले.

**इस्रो खासगीकरण**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच इस्रोचे खासगीकरण कऱण्याच्या बातम्यांचं इस्रोनं खंडन केले आहे. इस्रोचे खासगीकरण होणार नाही; तसेच इस्रोचे महत्त्वही कमी होणार नाही, असं इस्रोने समाज माध्यमांवरच्या संदेशातून स्पष्ट केलं आहे. उद्योगांनी तंत्रज्ञान आणि क्षमतांचा विस्तार केला, तर इस्रोला अत्याधुनिक अंतराळ उपक्रमांवर प्रभावीपणे लक्ष केंद्रित करता येईल, याच उद्देशानं अंतराळ क्षेत्रात खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्यात येत आहे. एक सक्षम आणि जागतिक पातळीवर स्पर्धात्मक भारतीय अंतराळ परिसंस्था उभारणं हे इस्रोचं लक्ष्य असल्याचं या संदेशात नमूद केलं आहे.

**महाभरती समिती**

महाराष्ट्रात राज्य सरकारच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या भरती परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याच्या उद्देशानं एका उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही राधा या समितीच्या अध्यक्ष आहेत. पोलिस महासंचालक सदानंद दाते यांच्यासह इतर सहा सदस्यांचाही यात समावेश आहे.

**मोहन यादव-दुबई दौरा**

मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉक्टर मोहन यादव काल संयुक्त अरब अमिरातीच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर रवाना झाले. दुबईत ते वार्षिक गुंतवणूक बैठकीत सहभागी होत गुंतवणूकदारांशी संवाद साधतील.
मध्य प्रदेशात विविध क्षेत्रांत गुंतवणूक आकर्षित करणे, व्यापार वृद्धिंगत कऱणे आणि तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीन हा दौरा महत्त्वाचा आहे.

**जैवविविधता परिषद**

स्थानिक जैवविविधता आणि पारंपरिक ज्ञानाची नोंद ठेवण्यासाठी स्थानिक पातळीवरील नियोजनाची गरज असल्याचं प्रतिपादन केंद्रीय पर्यावरण मंत्री भुपेंद्र यादव यांनी केले. चंदीगड इथं राज्य जैवविविधता

मंडळं आणि केंद्रशासित प्रदेश जैवविविधता परिषद यांच्या 16व्या बैठकीत ते काल बोलत होते. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी जन जैवविविधता नोंदवह्या नियोजनाचे प्रभावी साधन म्हणून विकसित झाल्या पाहिजेत, जेणेकरून स्थानिक जैवविविधता, पारंपरिक ज्ञान आणि शाश्वत विकासात त्या योगदान देऊ शकतील असंही ते म्हणाले.

**बलुचिस्तान-संचारबंदी**

पाकिस्तानच्या सुरक्षा दलांनी केलेल्या लष्करी कारवाईच्या पार्श्वभूमीवर, बलुचिस्तानमधील खुझदार जिल्ह्यातील झेहरी तहसील भागात सुरू असलेल्या दीर्घकालीन संचारबंदीची तीव्रता वाढवण्यात आल्याचं वृत्त आहे. या कारवाईदरम्यान, लोकांना बळजबरीनं ताब्यात घेणे आणि हवाई हल्ले करणं यांसारखे प्रकार घडल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. 'द बलुचिस्तान पोस्ट'च्या वृत्तानुसार पाकिस्तानी दलांनी सुन्नी भागातील सुमारे 25 रहिवाशांना ताब्यात घेतलं असून या भागात पाकिस्तानी दलांनी केलेल्या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू झाला आणि दोन जण जखमी झाले आहेत.

**मेक्सिको-फटाका स्फोट**

मेक्सिकोमधील तेमास्कलसिंगो शहरात काल रात्री एका उत्सवादरम्यान एका चर्चजवळ फटाक्यांचा स्फोट झाला. या दुर्घटनेत एक भिंत कोसळली असून, किमान 10 जणांचा मृत्यू झाला आहे आणि 64 जण जखमी झाले आहेत. उत्सवादरम्यान होणाऱ्या फटाक्यांच्या आतषबाजीचा कार्यक्रम पाहण्यासाठी शेकडो लोक तिथे जमले असताना हा स्फोट झाला.

**इंडोने-ज्वालामुखी**

इंडोनेशियातील 'अनाक क्राकाटाऊ' या ज्वालामुखीचा आज पहाटे उद्रेक झाला. यामुळे जकार्ताच्या सोएकार्नो-हट्टा आंतरराष्ट्रीय विमानतळावरील सर्व उड्डाणं रद्द करावी लागली. ज्वालामुखीची राख पश्चिम इंडोनेशियाच्या काही भागांत पसरल्यानं इतर देशांतर्गत विमानतळांच्या कामकाजावरही परिणाम झाला. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही.

**नाणी-जप्त**

इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोहा इथून आलेल्या दोन प्रवाशांकडून 484 चांदीची नाणी आणि एक सोन्याचे नाणे जप्त करण्यात आली. त्यापैकी 134 नाण्यांना पुरातत्वीय महत्त्व आहे. 2 सप्टेंबरला विमानतळावर सीमाशुल्क खात्याच्या अधिकाऱ्यांनी या प्रवाशांची तपासणी केल्यानंतर 20 किलोहून अधिक वजनाची ही नाणी जप्त केली.

**दिल्ली-मृत्यू**

दिल्लीत काल दुपारी सत्यनिकेतन परिसरात एक पाच मजली इमारत कोसळून सहा जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेच्या न्यायदंडाधिकारी पातळीवरील चौकशीचे आदेश दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दिले आहेत. इमारत मालकाविरुद्ध प्राथमिक चौकशी अहवाल दाखल करण्याचे निर्देशही दिले आहेत. घटनास्थळाचा प्राथमिक आढावा घेतल्यानंतर हे निर्देश देण्यात आल्याचे मुख्यमंत्री

कार्यालयानं स्पष्ट केलं आहे. घटनास्थळी ढिगारा उपसण्याचे आणि बचाव कार्य करण्याचे काम सुरू असून, आपत्ती प्रतिसाद दल, अग्निशमन दल आणि दिल्ली पोलिस कार्यरत आहेत. ही इमारत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना भाडेतत्वावर राहाण्यासाठी वापरली जात होती आणि घटनेच्या वेळी तळघरात दुरुस्तीचे काम सुरु होते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्री तसंच पोलिस आयुक्त, एनडीआरएफच्या महासंचालकांशी चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेतला. जखमींना सर्व वैद्यकीय मदत पुरवण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर दिल्ली विद्यापीठाचे 'श्री व्यंकटेश्वर महाविद्यालय' तसंच 'आर्यभट्ट महाविद्यालया'चे कामकाज बंद राहणार आहे. घटनेतील बाधित विद्यार्थ्यांच्या निवासाची तात्पुरती सोय या महाविद्यालयांमध्ये करण्यात आली आहे.

**बॅँडमिंटन**

भारतीय बॅडमिंटनपटू सात्विक साईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं काल शेन्झेन इथं झालेल्या चायना मास्टर्सच्या पुरुष दुहेरीच्या पहिल्या वहिल्या विजेतेपदावर आपलं नाव कोरलं. भारतीय जोडीनं चीनच्या हे जी टिंग आणि रेन शियांग यू यांचा पराभव केला. या जोडीचे हंगामातलं हे दुसरं विजेतेपद आहे. या जोडीला 2023 आणि 2025 या वर्षांत उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं होतं.

**पश्चिम बंगाल**

पश्चिम बंगालमध्ये तिस्ता नदीच्या खालच्या बाजूला राहाणाऱ्या नागरिकांना कालिम्पोंग जिल्हा प्रशासनानं सतर्कतेचा इशारा दिला आहे. सिक्कीमच्या मंगन जिल्ह्यात दरड कोसळण्याच्या घटनेमुळे तिस्ता नदीच्या प्रवाहात काहीसा अडथळा निर्माण झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर हा इशारा देण्यात आला आहे.

**हवामान**

देशात आज उत्तरेकडील बहुतांश राज्यात तसंच पश्चिम बंगाल आणि ईशान्येकडील काही राज्यांत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तर आंध्र प्रदेश, झारखंड, ओडिशा, कर्नाटक, तामिळनाडूमध्येही विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.